**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S.(ठाणे):** सिटी कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0191 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/04/2026 15:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 30/04/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/04/2026

**Time From (वेळेपासून):** 11:27 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/04/2026 **Time (वेळ):** 15:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 030

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/04/2026 15:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती अका◌ेला , बांधकाम विभाग कार्यालय,अका◌ेला

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मिलींदकुमार अशाेक बहाकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत ,विभाग प्रतिबंधक,अकोला,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत ,विभाग प्रतिबंधक,अकोला,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9158822676

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कु.जया पांडुरंग इंगोले | | | 1. मोठी उमरी,महात्मा फुले नगर अकोला, अकोला,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी लाच रक्कम रू. 30,000/ | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावेळी मा.पाेनि सा.यांचे अादेशाने डे अाॅफिसर GPSI खान यांनी अप नं.191/2026 कलम7भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नाेंद केला खालीलप्रमाणे फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधकविभाग,अकोला दिनांक:-30.04.2026मी मिलींदकुमार बहाकर, वय 47 वर्षे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला शासना तर्फे फिर्याद देतो की, दिनांक 27.04.2026 रोजी तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले, वय 32 वर्ष, षिक्षण- बिएससी, व्यवसाय-खाजगी कंत्राटदार, रा.ज्ञानेष्वर नगर, डाबकी रोड, अकोला ता.जि. अकोला हे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नोंदवून घेण्याची विनंती केली.सदर तक्रारीवरुन पुढिल कार्यवाहीकरीता मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 558/2026, दिनांक 27.04.2026 अन्वये पत्र दिले. त्यावरुन त्यांनी त्यांचे कार्यालयातील 1) श्री. हरिष जिवन कल्याणकर, पद-महसुल सेवक 2) श्रीमती दिपाली भगवान षेगोकार, पद-महसुल सेवक यांना पंच म्हणून लाप्रवि. अकोला कार्यालयात पाठविले. नमुद दोन्ही पंचांनी सदर कार्यवाहीत पंच म्हणुल काम करण्याची संमती दिली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत त्यांना तोंडी विचारपूस करण्यास सांगीतले. त्यावरून दोन्ही पंचांनी तक्रारदारास विचारणा केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांची तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटॉपवर टंकलिखित करण्यात आली. सदर टंकलिखित तक्रारीची प्रिंट आऊट काढून त्या तक्रारीवर तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांचेकडे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केलेला मजकुर सारखाच असल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.'' मी आज दिनांक 27.04.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी वर नमुद पत्यावर राहत असून खाजगी कंत्राटदार म्हणून कामकाज करतो. मला मार्च 2024 मध्ये दलीतवस्ती या योजनेअंतर्गत ग्राम कपीलेष्वर ता.जि.अकोला येथील आंबेडकर नगर वस्तीमध्ये श्री. दिगांबर तिडके यांचे घरापासून ते श्री. भिमराव वानखडे यांचे घरापर्यंत अंदाजे 110 मिटर सिमेंट कॉन्क्रीट रस्त्याचे काम करण्याबाबत ग्रामपंचायत कपीलेष्वर यांचेकडून काम मिळाले होते. त्यानुसार मी नमुद काम माहे जुलै 2024 मध्ये पुर्ण केलेले आहे. मी केलेल्या कामाचे श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांनी मोजमाप करून देयक पंचायत समिती, अकोला येथे सादर केले. त्यानुसार मला ग्रामपंचायत कपीलेष्वर यांचेकडून प्रथम देयक रू. 5,00,000/- माहे डिसेंबर 2024 मध्ये माझे दि. अकोला जनता कमर्षीअल को-ऑपरेटीव्ह बँक ली. अकोला येथील बँक खाते क्र. 103201/8578 मध्ये जमा झालेले आहे. तसेच दुसरे देयकाची रक्कम ही साहीत्य पुरवठा करणारी कंपनी 'ए.सी. इंटरप्रायझेस, अकोला' यांचे खात्यामध्ये माहे फेब्रवारी 2025 मध्ये रू. 5,00,000/- जमा झालेले आहेत.नमुद कामाच्या दोन्ही देयकाची रक्कम काढून देण्याचा मोबदला/बक्षीस म्हणून श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता यांनी माझ्याकडे मागील दिड वर्शापासुन वेळोवेळी रू. 30,000/- लाच रकम मागून तगादा लावलेला आहे. तसेच त्यांनी मला सांगीतले की, तुम्ही 30,000/- रूपये मला दिले नाही तर मी यापुढे तुम्ही केलेल्या कोणत्याही कामाचे देयके काढण्यासाठी तुम्हाला मदत करणार नाही.गैरअर्जदार श्रीमती जया

इंगोले, कनिश्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांनी ग्राम कपीलेष्वर येथील श्री.दिगांबर तिडके यांचे घरापासून ते श्री. भिमराव वानखडे यांचे घरापर्यंत 110 मिटर सिमेंट कॉन्क्रीट रस्त्याचे कामाचे देयक काढून देण्याचा मोबदला म्हणून माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 30,000/- त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझी त्यांचेषी कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण अथवा वैमनस्य नाही.''तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हॉईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी दिनांक 28.04.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 27.04.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 28.04.2026 चे 16.52 वा. ते 17.14 वा. दरम्यान गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांची तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी करण्याकरीता तक्रारदार व पंच क्र. 1 यांना पचायत समिती, अकोला तसेच आकाषवाणी समोरील बांधकाम विभाग, अकोला येथे पाठविण्यात आले होते परंतु सदर ठिकाणी गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले हे हजर मिळून आल्या नाहीत. त्यामुळे गैरअर्जदार हे सध्या कुठे आहेत? याबाबत माहिती घेण्याकरीता तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना फोन करून माहिती घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनांक 28.04.2026 चे 17.32 वा. ते 18.42 वा. तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना फोन करून् माहिती घेतली असता, गरअर्जदार यांनी तक्रारदारास त्यांचे राहते घर उमरी, अकोला येथे बोलाविले. त्यानुसार गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांची तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले यांचे राहते घर उमरी, अकोला ता.जि. अकोला येथे करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही मध्ये तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांनी सन 2024 मध्ये ग्राम कपीलेष्वर ता.जि. अकोला येथे दलीतवस्ती या योजनेअंतर्गत केलेल्या सिमेंट कॉन्क्रीट रस्त्याचे एकुण 10 लाख रूपयाचे देयक काढून देण्याचा मोबदला म्हणून गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले यांनी तक्रारदाराकडे रू. 30,000/- लाच रकमेची मागणी केली. तसेच सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले हे उद्या दिनांक 29.04.2026 रोजी अकोट येथे लग्नाकरीता जात असल्याचे सांगीतल्याने गैरअर्जदार यांचेविरूध्द पुढील सापळा कार्यवाही दिनांक 30.04.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 28.04.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 30.04.2026 चे 11.27 वा. ते 12.08 वा. दरम्यान गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता यांचेविरूध्द बांधकाम विभाग, पंचायत समिती कार्यालय, अकोला ता.जि. अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता यांनी तक्रारदार श्री. अक्षय सुधाकर झटाले यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 30,000/- तक्रारदाराकडून स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यानंतर गैरअर्जदार श्रीमती जया इंगोले, कनिश्ठ अभियंता यांनी तक्रारदाराकडून स्विकारलेले लाच रक्कम रू. 30,000/- दोन्ही पंचासमक्ष जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली. दिनांक 30.04.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.करीता गैरअर्जदार कु. जया पांडुरंग इंगोले, वय 49 वर्श, पद-कनिश्ठ अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, अकोला वर्ग-3, रा. महात्मा फुले नगर, मोठी उमरी, अकोला ता.जि. अकोला यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने माझी त्यांचे विरूध्द शासनातर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJAY NATTHU GAWAI(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY NATTHU GA\
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)